पोलीस ठाणे बदनापूर ता.बदनापूर,जि.जालना

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना

**P.S.(ठाणे):** बदनापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0530

**Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/10/2026 00:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 09/10/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/10/2026

**Time From (वेळेपासून):** 15:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/10/2026 **Time (वेळ):** 23:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2026 23:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 08 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गेवराई बाजार फाटा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

S.No
(अ.
10

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रतिभा गोरख आबुज

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,बदनापूर,जालना,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,बदनापूर,जालना,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637774599

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोविंद फुलसिंग डोभाळ स.फौब.नं. 460 | | | 1. पोस्टेबदनापूर जि जालना , बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | परमेश्वर नामदेव ढगे पोअंब.नं.494 | | | 1. पोस्टे बदनापूर जि जालना , बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 09/10/2026

मी प्रतिभा गोरख आबुज, वय 37 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9637774599

मी वरील प्रमाणे असुन, दि.08/10/2026 रोजी सायंकाळी तक्रारदार श्री. दादाराव सखाराम म्हस्के, रा. भाकरवाडी ता.बदनापूर, जि.जालना यांचा फोन आला व त्यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली व दि. 09/10/2026 रोजी एमआयडीसी करमाड येथे येण्याची विनंती केली. त्याप्रमाणे आम्ही दोन शासकीय पंच व सापळा पथकासह लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासह शासकीय वाहनाने ला.प्र.वि.संभाजीनगर येथुन 10.15 वा.सुमारास निघुन तक्रारदार यांचेशी संपर्क करत 10.50 वा.सुमारास करमाड एमआयडीसी परिसरात पोहचलो. त्या ठिकाणी तक्रारदार दादाराव म्हस्के हे त्यांचेकडील मोटार सायकलसह हजर होते त्यावेळी त्यांचे सोबत आमचा परिचय झाला त्यावेळी त्यांनी त्यांची दोन्ही पंचासमक्ष तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर त्यांना त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगितली असता त्यांनी त्यांचे हस्ताक्षरात लेखी तक्रार लिहुन दिली. त्या तक्रारीमध्ये तक्रारदार यांचा मुलगा विशाल दादाराव म्हस्के याचेवर पो.स्टे.बदनापूर येथे दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास पो.स्टे.बदनापूर येथील बीट जमादार डोभाळ यांचेकडे आहे. त्या गुन्हयात तक्रारदार यांचा मुलगा विशाल याला गुन्हयात अटक न करता, मदत करुन, पुढील कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे बीट जमादार डोभाळ व त्यांचा रायटर परमेश्वर ढगे हे 25,000/- रुपये लाचेची मागणी करत आहेत अशी दोन पंचासमक्ष स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार लिहुन दिली. त्यानंतर सदर तक्रार आम्ही दोन्ही पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या. त्यावेळी तक्रारदार यांना बीट जमादार डोभाळ व परमेश्वर ढगे हे कुठे भेटतील असे विचारले तर त्यांनी ते पो.स्टे.बदनापूर येथे असतात तेथेच त्यांना भेटायला जाणे आहे असे कळविले. त्यावेळी बीट जमादार डोभाळ व त्यांचा रायटर परमेश्वर ढगे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईची प्रक्रिया व टप्पे समजावुन सांगितले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांना लाचमागणी पडताळणी बाबत सुचना देऊन, मार्गदर्शन केले. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे गळयात आडकुन दिला व पंच क्र.1 यांना यांना सोबत देऊन तक्रारदार यांच्या मो.सा.वरुन लाचमागणी पडताळणीसाठी 12.20 वा.रवाना केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे 12.49 वा.सुमारास परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. व तक्रारदार यांचे समक्ष पंच क्र.1 यांना लाचमागणी पडताळणी बाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचा मुलगा विशाल याचेवर पो.स्टे.बदनापूर येथे दाखल झालेल्या गुन्हयात सहकार्य करुन, कारवाई न करण्यासाठी पोलीस डोभाळ व त्यांचे सोबतचे परमेश्वर ढगे यांनी तक्रारदार यांचेकडे 25 हजार रुपयांची मागणी करत होते त्यावेळी तक्रारदार यांनी पैसे कमी करण्याची विनंती केल्यानंतर शेवटी त्या दोघांनी 20 हजार रुपये घेऊन येण्याचे सांगितले त्यानंतर आम्ही दोघे परत आलो असे सांगितले. त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष शासकीय वाहनात बसुन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन त्यातील लाचमागणी पडताळणी वेळीचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरचा आवाज मोठा करुन आम्ही सर्वांनी ऐकले तर त्यात बीट जमादार



Scanned with OKEN Scanner

डोभाळ व त्यांचा रायटर परमेश्वर ढगे या दोघांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या तक्रारीप्रमाणे त्यांचा मुलगा विशाल याचेवर दाखल अदखलपात्र गुन्हयात सहकार्य करुन, पुढील कारवाई न करण्यासाठी 25,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये स्वत: स्विकारणार असल्याचे लाचमागणी पडताळणीतील संभाषणावरुन स्पष्ट झाले. तक्रारदार यांना लाचेची रक्कम थोडया वेळाने घेऊन बोलविले असल्याने सापळा कारवाईचे नियोजन करणे असल्याने लाचमागणीतील संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट नंतर काढण्याचा निर्णय घेण्यात आला व पुढील सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले.
त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार यांना लाचेची रकमेची विचारणा केली असता त्यांनी 20,000/- रुपये ज्यात 500/- दराच्या 8 व 100/- दराच्या 160 भारतीय चलनी नोटा पंचासमक्ष हजर केल्या. त्यावेळी सापळा कारवाईची माहीती देऊन, प्रक्रिया समजावुन सांगितली. अॅन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचे गुणधर्म व कामकाजाबाबत माहीती सांगुन, प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर वरील लाचेच्या रकमेला अॅन्थ्रॉसीन पावडर व्यवस्थीत लावुन तक्रारदार यांच्या अंगातील पॅन्टच्या उजवे बाजुचे समोरील खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांनी बीट जमादार डोभाळ यांना फोन केला त्यावेळी डोभाळ यांनी तक्रारदार यांना गेवराई बाजार फाटयावर बोलविले. त्याप्रमाणे गेवराई बाजार फाटयावर सापळा कारवाई आयोजीत करण्यात आली.
त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांचे गळयात अडकवुन दिला व पंच क्र.1 याचेसह गेवराई बाजार फाटयावरील सपकाळ अॅटो दुकानाला लागुन उजव्या बाजुस असलेल्या हॉटेलवर थांबविले. त्यानंतर तक्रारदार यांना बीट जमादार डोभाळ यांचा फोन आला व थोडया वेळात गेवराई फाटयावर येत असल्याचे सांगितले. त्यानंतर थोडयाच वेळात एक पांढ्या रंगाची चारचाकी स्विप्ट कार आली. त्या कारमधील बीट जमादार डोभाळ यांनी त्यावेळी तक्रारदार यांना हॉटेलमधुन बाहेर बोलविले त्यावेळी तक्रारदार व पंच क्र.1 हे सदर गाडी जवळ गेले त्यावेळी गाडीचे चालकाचे डावे बाजुचे समोरील दरवाजा उघडला त्यावेळी तक्रारदार यांनी त्या गाडीतील दोन्ही व्यक्तीशी बोलणे चालू असताना तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजव्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन गाडीतील व्यक्ती समोर धरली असता सदर गाडीतील चालक सीट वर परमेश्वर ढगे बसले होते तर त्यांच्या डाव्या बाजुला समोरील सिटवर बीट जमादार डोभाळ बसले होते त्यावेळी परमेश्वर ढगे यांनी बीट जमादार डोभाळ यांचे समक्ष त्यांच्या डाव्या हाताने तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन सदर गाडीच्या हॅन्ड ब्रेक जवळ ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांचा लाच स्विकारल्याचा इशारा त्यांनी त्यांचे पॅन्टचे डावे बाजुचे मागचे खिशातुन पांढ्या रंगाचा हात रुमाल डाव्या हाताने काढुन हातात घेतल्याचा इशारा 15.43 वा.केला. त्यावेळी आम्ही तात्काळ पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्यांसह हजर आलो. त्यावेळी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारणारे गाडीतील दोन्ही इसमांना त्यांचे नाव विचारता सदर गाडीच्या चालक सिटवरील व्यक्तीने त्याचे नांव परमेश्वर नामेदव ढगे, वय 32 वर्षे, पोअं/ब.नं.494 व त्याचे बाजुचे सीटवरील व्यक्तीने त्याचे नाव गोविंद फुलसिंग डोभाळ वय 56 वर्षे, स.फौ/ब.नं.460 दोघे नेम.पो.स्टे.बदनापूर असे सांगितले त्यावेळी त्यांना लाचेची रक्कम बाबत विचारणा करता त्यांनी लाचेची रक्कम हॅन्डब्रेक जवळ ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष सदर गाडीच्या हॅन्डब्रेकजवळ पाहणी केली असता लाचेची रक्कम मिळुन आली. त्यावेळी सदर गाडीचे दरवाजे, काचा बंद करुन, काळया कपडयाचे सहयाने अंधार करुन अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या प्रकाशात दोन्ही आरोपीतांचे दोन्ही हाताची पाहणी केली असता ड्रायव्हर सिटवर बसलेले परमेश्वर ढगे यांच्या डाव्या हताचे तळहातावर व बोटांवर अॅन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली, तसेच सदर गाडीच्या हॅन्ड ब्रेकजवळ पाहणी केली असता ठिकठिकाणी अॅन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच सदर लाचेच्या रकमेवर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता त्यावरही अॅन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली ही बाब डोभाळ व ढगे यांचे निदर्शनास आणुन दिली. त्याबाबत आमचे मोबाईल मध्ये व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आलेली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात आली त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी आरोपी लोकसेवक क्र.1 गोविंद फुलसिंग डोभाळ वय 56 वर्ष, स.फौ/ब.नं.460, नेम.पो.स्टे.बदनापूर यांनी तक्रारदार दादाराव सखाराम म्हस्के रा.भाकरवाडी यांचा मुलगा विशाल याचेवर पो.स्टे.बदनापूर येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयात सहकार्य करुन, पुढील कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 25,000/- रुपये लाचमागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये दि.09/10/2026 रोजी 12.20 ते 12.39 वा.दरम्यान स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आलोसे क्र.2 परमेश्वर नामदेव ढगे, वय 32 वर्षे, पोअं/ब.नं. 494 यांनी तक्रारदार यांचेकडे स्वत: लाचमागणी करुन आलोसे क्र.1 यांचे लाचमागणीस प्रोत्साहन देऊन मागणी केलेली लाचेची रक्कम दि.09/10/26 रोजी 15.43 वा.सुमारास गेवराई बाजार फाटयावरील सपकाळ अॅटो दुकानाचे समोर रोडच्या कडेला पांढ्या रंगाची चारचाकी गाडी क्र.एच.एच.20 सी एस 5777 मध्ये बसुन लाचेची



Scanned with OKEN Scanner

रक्कम 20,000/- रुपये ज्यात 500/- व 100 भारतीय चलनी नोटा ज्यांना अॅन्थ्रॉसीन पावडर लावलेली पंचासमक्ष आलोसे क्र.1 समक्ष स्वत: स्विकारुन सहाय्य केले. म्हणुन माझी त्या दोघांविरुध्द कलम- 7,12 भ्र.प्र. अधि.1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MACHINDRA TUKARAM SURAVSE(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with OKEN Scanner

पोलीस ठाणे अमलदार

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MACHINDRA TUKAR

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner